# भाग – 1
# आंतरशाखीय मुद्दे
# (व्यापक बाबी)

घटकसंच 1 – अभ्यासक्रम, अध्ययनार्थीकेंद्रित अध्यापनशास्त्र, अध्ययन निष्पत्ती आणि सर्वसमावेशक शिक्षण

घटकसंच 2 – सुरक्षित आणि निकोप शालेय वातावरण निर्मितीसाठी वैयक्तिक व सामाजिक गुणवैशिष्ट्यांचे विकसन

घटकसंच 3 – कला एकात्मिक अध्ययन

घटकसंच 4 – शाळा आधारित मूल्यांकन

घटकसंच 5 – शाळांमधील आरोग्य व स्वास्थ्य

घटकसंच 6 – माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाचे (ICT) अध्ययन, अध्यापन आणि मूल्यांकनातील एकात्मीकरण

घटकसंच 7 – शालेय शिक्षणातील पुढाकार

*एखादा शिक्षक जर स्वत:च अध्ययन करत नसेल, तर तो*
*योग्य प्रकारे अध्यापन करतो आहे असे म्हणता येणार नाही.*
*एखाद्या दिव्याची स्वत:ची वात जर जळत नसेल तर*
*तो दुसरा दिवा कधीही पेटवू शकणार नाही.*
*ज्या शिक्षकाने स्वत:च्या विषयाचा अभ्यास थांबविलेला आहे,*
*आपल्या ज्ञानात जो भर घालत नाही, तर केवळ*
*ठरावीक पाठच विद्यार्थ्यांना शिकवित राहतो,*
*असा शिक्षक त्यांच्या मनात माहिती साठवायला*
*मदत करू शकेल, पण त्यांच्यामधील*
*स्फुल्लिंग चेतवू शकणार नाही.*

***रवींद्रनाथ टागोर (1994),***
*'' द इंग्लिश रायटिंग ऑफ रवींद्रनाथ टागोर : अ मिसलेनी ''*
*पृष्ठ क्र. 64, साहित्य अकादमी.*

घटकसंच 1

# अभ्यासक्रम, अध्ययनार्थीकेंद्रित अध्यापनशास्त्र, अध्ययन निष्पत्ती आणि सर्वसमावेशक शिक्षण

**रूपरेषा :**

गेल्या काही वर्षांत शिक्षण हक्क कायदा (RTE), 2009 आणि आपल्या शैक्षणिक धोरणांमुळे आपल्या वर्गांमधील विद्यार्थी रचना कमालीची बदलून गेलेली आहे. शिक्षक आणि शिक्षक प्रशिक्षक यांना विद्यार्थ्यांमधील हे वैविध्य नक्कीच लक्षात आलेले असेल. यातूनच आपल्याला जुन्या पद्धतीने विद्यार्थ्यांना शिकविता येणार नाही आणि त्यांना तसे शिकवू नये हे देखील तुमच्या लक्षात आले असेल. सर्व विद्यार्थ्यांना अध्यापन–अध्ययनाच्या कृतींमधून आव्हानात्मक संधी मिळण्याची व त्यांनी यश अनुभवण्याची गरज याआधी कधीही नव्हती एवढी प्रकर्षाने आज जाणवत आहे.

***'जर काही मुले आपण ज्या पद्धतीने शिकवतो, त्यातून शिकत नसतील, तर ती ज्या पद्धतीने शिकू शकतात, तसे आपण त्यांना शिकविले पाहिजे....' – इग्नॅशिओ एस्ट्राडा*** [1]

या घटकातून शिक्षकांना पुढील गोष्टींसाठी साहाय्य मिळेल : भारत हा बहुसंस्कृतीय समाज असून अनेक प्रादेशिक व स्थानिक संस्कृतींनी तो बनलेला आहे. लोकांच्या धार्मिक श्रद्धा, जीवन जगण्याची पद्धत आणि त्याच वेळी सामाजिक नातेसंबंधाबाबतचे आकलन परस्परांपेक्षा मोठ्या प्रमाणावर वेगवेगळे असते. सर्वच समाज गटांना परस्परांसमवेत राहण्याचा आणि प्रगती करण्याचा समान हक्क आहे आणि शिक्षणपद्धतीने आपल्या समाजामधील सांस्कृतिक विविधतेला प्रतिसाद दिला पाहिजे.

*राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (NCF) 2005*

या प्रभागाचा उद्देश तुमच्यासारख्या शिक्षकांना आणि शिक्षक प्रशिक्षकांना साहाय्य करणे हे आहे. यातून तुम्हाला आपल्या वर्गांमध्ये असणारी विविधता आणि अध्यापन–अध्ययन समावेशक होण्यासाठी सुयोग्य शिक्षणपद्धती यांच्याकडे नव्या दृष्टीने पाहता येईल. येथे सुचविलेल्या गोष्टी संशोधन आणि अनुभव यांमधून संकलित केलेल्या आहेत. त्यातून तुम्हाला एकाच वर्गातील वेगवेगळ्या प्रकारच्या अध्ययनासाठीच्या गरजा पूर्ण करण्यासाठी सर्वसमावेशक अध्ययनासाठीचे वातावरण तयार करता येईल. या आशयातून तुम्हाला राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, अभ्यासक्रम, पाठ्यक्रम, क्रमिक पुस्तके, राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (विशेषत: (NCF–2005) आणि नव्यानेच विकसित करण्यात आलेल्या अध्ययन निष्पत्ती यांकडे अगदी जवळून पाहता येईल. (यामध्ये अभ्यासक्रमातील अपेक्षा आणि अध्यापन शास्त्रातील प्रक्रिया यांची जोडणी करण्यात आलेली आहे.)

*भारत हा बहुसंस्कृतीय समाज असून अनेक प्रादेशिक व स्थानिक संस्कृतींनी तो बनलेला आहे. लोकांच्या धार्मिक श्रद्धा, जीवन जगण्याची पद्धत आणि त्याच वेळी सामाजिक नातेसंबंधाबाबतचे आकलन परस्परांपेक्षा मोठ्या प्रमाणावर वेगवेगळे असते. सर्वच समाज गटांना परस्परांसमवेत राहण्याचा आणि प्रगती करण्याचा समान हक्क आहे आणि शिक्षण पद्धतीने आपल्या समाजामधील सांस्कृतिक विविधतेला प्रतिसाद दिला पाहिजे.*

*राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (NCF) 2005*

***महत्त्वाची टीप :*** *शिक्षक प्रशिक्षक आणि सहभागी झालेल्या संसाधन व्यक्ती यांना या प्रशिक्षणादरम्यान, चर्चा दरम्यान जोडी व गटात काम करताना, विचारमंथन करताना आणि अन्य प्रकारचे संवाद आणि विचार इ. प्रकार हाताळताना त्यामध्ये रस जागृत ठेवणे आवश्यक आहे. प्रस्तुत पुस्तकाच्या मजकुरातील 'चर्चेसाठीचे मुद्दे' याकरिता वापरता येतील.*

[1] *इग्नॅशिओ एस्ट्राडा, गॉर्डन आणि बेट्टी मोर फाऊंडेशन संचालक; httpp://www.aids.org.*

## अध्ययनाची उद्दिष्टे

या घटकातून शिक्षकांना पुढील गोष्टींसाठी साहाय्य मिळेल :

- शैक्षणिक धोरणे, राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा विकास, दिलेल्या अभ्यासक्रमातील कार्ये व त्यातील हेतू, देवाणघेवाण व मूल्यमापन यांमधील परस्परसंबंध.
- राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा 2005 चा दृष्टिकोन स्पष्ट करणे आणि त्याचे पाठ्यक्रम व क्रमिक पुस्तके यांमध्ये रूपांतर करणे.
- विविधतेबाबत अधिक व्यापकतेने समजावून घेणे आणि समावेशक शिक्षणासाठीचा दृष्टिकोन अधिक विकसित करणे.
- विद्यार्थ्यांमधील अध्ययन निष्पत्ती सुधारावी याकरिता अध्यापन शास्त्राचा वापर करून त्यांच्या सध्याच्या कौशल्यांना विकसित करणे.
- वर्गखोलीतील लिंगभावाच्या दृष्टीने संवेदनशील वातावरणासाठी अध्ययन कृतींचा वापर करणे व अध्ययन कृतींमध्ये बदल करणे.

## मुख्य कल्पनेबाबत

**संज्ञा, धोरणे आणि संरचना :** आराखडा उलगडून दाखविताना वरील उद्देश साध्य करण्यासाठी सुरुवातीलाच आपण राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा यांचा बारकाईने अभ्यास केला पाहिजे आणि अभ्यासक्रम, पाठ्यक्रम, क्रमिक पुस्तके आणि अध्ययन निष्पत्ती यांबाबतच्या आकलनामध्ये सुधारणा केली पाहिजे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण
↓
राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा
↓
अभ्यासक्रम
↓
पाठ्यक्रम
↓
क्रमिक पुस्तके
↓
शिक्षकांसाठीची पूरक सामग्री
↓
अध्ययन निष्पत्ती

### राष्ट्रीय शिक्षणविषयक धोरण :

भारताने नुकताच राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP), 2019 चा मसुदा सार्वजनिकरित्या खुला केलेला असून त्यामध्ये विशाल शैक्षणिक रूपरेषेमधील विविध गोष्टी नमूद केल्या आहेत. देशभरात वेगवेगळ्या ठिकाणी होणाऱ्या चर्चा व त्यातून येणाऱ्या सूचना (www.mygov.in) या वेब पोर्टलवर उपलब्ध आहेत. यांसाठीच्या वेगवेगळ्या लाभार्थ्यांमध्ये शिक्षकांच्या मताला मोठेच महत्त्व आहे. या आधी दोनदा म्हणजे सन 1968 आणि 1986 मध्ये शिक्षणविषयक राष्ट्रीय धोरणे अस्तित्वात आलेली होती. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 1986 मध्ये सर्व विद्यार्थ्यांची जात, वंश, स्थान किंवा लिंग या बाबी विचारात न घेता त्यांना एका विशिष्ट पातळीपर्यंत समान दर्जाचे शिक्षण मिळेल यासाठी एक राष्ट्रीय शिक्षण पद्धती विकसित करण्यावर भर दिला गेलेला होता. या धोरणांतर्गत नॅशनल कौन्सिल ऑफ एज्युकेशनल रिसर्च ॲन्ड ट्रेनिंग (NCERT) अन्य संलग्न संस्थांच्या मदतीने राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा विकसित करेल असे सांगण्यात आले होते. या धोरणाबाबतचे दस्तावेज वाचण्याकरिता http://www.ncertnic.in/newpolicy.html ला भेट द्या.

राष्ट्रीय शिक्षण पद्धती ही राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्यावर आधारित असेल, ज्यामध्ये अन्य काही घटकांबाबत लवचीकता ठेवून सक्षम गाभा समाविष्ट केला असेल. यातील मुख्य गाभ्यामध्ये भारतीय स्वातंत्र्याचा इतिहास, राज्यघटनेबाबतची कर्तव्ये आणि राष्ट्रीय अस्मिता जोपासण्यासाठी आवश्यक असणारा आशय असेल. हे मुद्दे वेगवेगळ्या अभ्यास क्षेत्रांमध्ये सामाईक असतील आणि त्यातून भारताचा सामाईक सांस्कृतिक वारसा, समतावाद, लोकशाही आणि निधर्मीपणा, लिंगभेद विरहित समता, पर्यावरणाचे रक्षण, सामाजिक अडथळ्यांचे निर्मूलन, लहान आकाराच्या कुटुंबपद्धतीचे पालन आणि वैज्ञानिक मनोवृत्तीची जडणघडण यांसारख्या मूल्यांचा पुरस्कार करण्यात येईल. सर्व शैक्षणिक कार्यक्रम ठोसपणे निधर्मी मूल्यांशीच निगडित असतील. (राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, 1986.)

**चर्चेसाठीचे मुद्दे :**

जसजसा काळ पुढे जातो, तसतसा धोरणांमध्ये बदल होतो आणि हा बदल आपल्याला राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) 1986 व राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) 2019 च्या मसुद्यामध्येही दिसून येईल. उदाहरणार्थ, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) 1986 मध्ये शालेय अभ्यासक्रमाची रचना 10 + 2 + 3 पद्धतीने करण्याचा प्रस्ताव होता, तर राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) 2019 च्या मसुद्यामध्येही रचना 5 + 3 + 3 + 4 अशी असावी असे सुचवलेले आहे. आपल्या जोडीदारासोबत या नव्या शालेय शिक्षण पद्धतीच्या रचनेबाबत तुम्हाला कोणते आकलन झाले याबद्दल चर्चा करा. शिवाय या दोन धोरण दस्तऐवजांमध्ये अन्य कोणत्या मुद्द्यांमध्ये फरक आहे याबद्दल चर्चा करा.

## राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा : ऐतिहासिक दृष्टिकोन

NCF 2005 हा एक महत्त्वाचा दस्तावेज आहे. याचे वर्गातील अंमलबजावणीचा परिणाम वाढण्याअगोदर आपण वेगवेगळी शैक्षणिक धोरणे आणि अभ्यासक्रम आराखडा यांचा ऐतिहासिक मागोवा घेऊ. एनसीईआरटीची स्थापना 1961 मध्ये झाली. त्यामागचा उद्देश 'शैक्षणिक सामग्रीचे विकसन' करणे हा होता आणि पहिला शैक्षणिक आराखडा 1975 मध्ये विकसित झाला. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 1986 च्या अनुषंगाने सन 1988 मध्ये NCERT ने एक अभ्यासक्रम आराखडा विकसित केला त्याचे नाव होते – 'राष्ट्रीय प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण अभ्यासक्रम : एक आराखडा.'




राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 1986 मध्ये सुचविलेल्या सामाईक मुख्य तत्त्वांना त्यात अधोरेखित केलेले आहे. सन 2000 मध्ये शालेय शिक्षणासाठी राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा–2000 तयार करण्यात आला. या आराखड्याचा मुख्य भर विद्यार्थ्यांनी असमानतेशी लढा देण्यासाठी ज्ञान मिळविणे आणि विद्यार्थ्यांच्या सामाजिक, सांस्कृतिक, भावनिक व आर्थिक गरजा भागविणे यावर होता.

## NCF 2005 : परिचय

सन 2005 मध्ये NCERT ने राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा 2005 सोबतच शालेय शिक्षणाच्या विविध पैलूंबाबत विवेचन करणारे 21 अभ्यास निबंध प्रसिद्ध केले. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा कायदा 2009 मध्ये राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा 2005

राबविण्याबाबतचा स्पष्ट उल्लेख केलेला आहे. यामध्ये विद्यार्थ्यांना कुठलाही ताण न येता विद्यार्थिकेंद्री वातावरण तयार करण्यावर भर देण्यात आलेला आहे. या संबंधीच्या अधिक माहितीसाठी https://mhrd.gov.in/rte या वेब लिंकला भेट द्या.

सामाजिक व आर्थिक बदलाच्या अनुषंगाने राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा 2005 (NCF 2005) मध्ये शालेय शिक्षणाच्या दृष्टीने पुढील उद्दिष्टे समोर ठेवलेली आहेत :

- विद्यार्थ्यांना आपले विचार व कृतीबाबत स्वावलंबी बनविणे, इतरांचे हित व भावना याबाबत त्यांची संवेदनशीलता जागृत करणे.
- विद्यार्थ्यांना नवीन परिस्थितीला लवचीक व सर्जनशील प्रतिसाद देण्यास तसेच लोकशाही प्रक्रियांमध्ये सहभागी होण्यास सक्षम बनविणे.
- विद्यार्थ्यांमध्ये आर्थिक प्रक्रिया आणि सामाजिक बदलासाठी झटण्याची व त्यात आपले योगदान देण्याची क्षमता विकसित करणे.

हा उद्देश साध्य करण्याकरिता शाळांनी समता, गुणवत्ता आणि लवचीकता यांवर आपले लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. आपल्या देशामधील विविधता लक्षात घेता, वर्गामध्ये विद्यार्थ्यांची पार्श्वभूमी लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. NCF 2005 मध्ये शिक्षकांनी क्रमिक पुस्तकांच्या पलीकडे जाऊन आपली भूमिका बजावावी अशी अपेक्षा व्यक्त केलेली आहे. यामुळे विद्यार्थ्यांना भूमिका अभिनय, रंगकाम, चित्रकला, नाट्य, क्षेत्रभेटी आणि वेगवेगळे प्रयोग करून स्वत:च्या अनुभवांमधून शिकता येईल.

NCF 2005 चा भर मूल्यांकनाकडे अध्ययनाचाच भाग म्हणून पहावा व तो वर्गातील प्रक्रियेचाच एक अविभाज्य घटक असावा, यावर आहे. विद्यार्थ्यांच्या परीक्षा निकालांची वाट पहाणे, त्याच्या नोंदी करणे व प्रगतिपत्रक बनविणे इ. मध्ये वेळ घालविण्यापेक्षा शिक्षकाने सातत्यपूर्ण व सर्वंकष मूल्यमापन करणे अपेक्षित आहे, जेणेकरून त्यांना ताबडतोब साहाय्य करता येईल व या गोष्टी टाळता येतील. शिवाय केवळ गणित, भाषा, विज्ञान आणि समाजशास्त्र शिकण्याखेरीज जीवनकौशल्ये सामाजिक, व्यक्तिगत, भावनिक आणि क्रियाकौशल्यात्मक (psycho-motor) कौशल्ये शिकण्यावर भर दिलेला आहे. NCF 2005 मध्ये विद्यार्थिकेंद्रित शिक्षणपद्धती अधोरेखित केलेली आहे. त्यानुसार पाठ्यक्रम, क्रमिक पुस्तके आणि वर्गातील कृतींचे नियोजन इ. विकसित करणे अपेक्षित आहे. उदा. : जर आपल्याला 'वनस्पती' बाबत वर्णन अंतर्भूत करायचे असेल, तर वर्गातील प्राथमिक स्तरावर पाठ्यक्रमामध्ये विद्यार्थी ज्या वनस्पती पाहू शकतात, स्पर्श करू शकतात आणि त्यांच्या दैनंदिन जीवनात ज्या शिक्षकांना बोलत असतात, अशा गोष्टींवर लक्ष केंद्रित केले पाहिजे. पाठ्यपुस्तकांमध्येही त्याचेच वर्णन असले पाहिजे. शिक्षकांनी विद्यार्थी आपले घर, आजूबाजूचा परिसर, शाळा, इ. च्या जवळ असणाऱ्या झाडांबाबतची माहिती एकमेकांना सांगू शकतील किंवा त्यांची भित्तीपत्रके बनवू शकतील अशा प्रकारच्या संधींचे आयोजन केले पाहिजे. अशाप्रकारे विद्यार्थ्यांमध्ये पाठ्यपुस्तकातील माहिती आणि त्याच्याशी स्वत:चे अनुभव जोडण्याची प्रक्रिया सुरू करता येईल. हे करताना, शिक्षक प्रत्येक विद्यार्थ्यांच्या अध्ययन निष्पत्तीमधील प्रगतीचे निरीक्षण करेल.

**चर्चेसाठीचे मुद्दे**

*जोडीमध्ये काम करा व एखाद्या शिक्षकाच्या सर्वसामान्य शाळेच्या दिवसामध्ये जरा डोकावून पहा. रोज जे शिक्षण दिले जाते त्यात शिक्षणाची वरीलपैकी कोणकोणती उद्दिष्टे प्रत्यक्षात येतात यावर विचार करून पहा. तुम्ही तुमच्या शालेय दिनक्रमात काय काय करता?*

## शालेय पाठ्यविषय आणि एनसीएफ 2005

आता जरा एनसीएफ 2005 आणि वेगवेगळ्या विषयांच्या अध्यापनाकडे बारकाईने पाहू या. भाषा विषय शिकवित असताना, तिचा वापर बहुविध भाषांवर प्रभुत्व यावे याबाबत पुरस्कार करण्यासाठीचे संसाधन म्हणून वापरले जावे असे या आराखड्यात अधोरेखित केलेले आहे. प्रत्येक अभ्यास विषयात भाषा शिकण्याला महत्त्व दिले गेले पाहिजे. कारण ती अभ्यासक्रमात सर्वत्रच असते. अभ्यासक्रमाच्या सर्वच क्षेत्रांमध्ये वाचन व लेखन, श्रवण आणि भाषण इ. कौशल्ये मुलांच्या प्रगतीचे घटक असतात. अभ्यासक्रमाचे नियोजन करीत असताना हा त्याचा पाया असणे आवश्यक आहे. गणित हा विषय अशाप्रकारे शिकविला गेला पाहिजे की त्यामुळे विचार करणे, तर्क करणे,

कल्पनाशक्ती, सूत्रांद्वारे वेगवेगळे प्रश्न सोडविण्याची क्षमता आणि अमूर्त संकल्पनांची हाताळणी इ. विषयी योग्य दृष्टिकोन निर्माण होईल. विज्ञान हा विषय मुलांना दैनंदिन अनुभवांची चिकित्सा व पृथक्करण करता येईल अशा प्रकारे शिकविला गेला पाहिजे. प्रत्येक विषयात पर्यावरणाची काळजी घेण्यावर भर देण्यात यावा. प्रत्येक कृतीमध्ये बाह्य परिसरातील प्रकल्पांचा समावेश असावा.

समाजशास्त्राचे अध्ययन करत असताना या विषयातील महत्त्वाचे टप्पे जाणून घेण्यासोबतच उपेक्षित गटांचा दृष्टिकोनही सामावून घेण्यावर भर दिलेला आहे. समाजशास्त्राच्या सर्वच क्षेत्रांमध्ये उपेक्षित गट आणि लिंग भाव, न्याय, आणि जी मुले उपेक्षित गटांमधील आहेत त्यांच्या तसेच अल्पसंख्याकांच्या संवेदनशीलतेला सामावून घेतले पाहिजे. राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा 2005 मध्ये अभ्यासक्रमातील पुढील चार मुद्द्यांकडेही लक्ष वेधलेले आहे : कार्य, कला आणि पारंपरिक हस्तकला, आरोग्य व शारीरिक शिक्षण आणि शांतता. या सर्व क्षेत्रांचा विचार अभ्यासक्रमात केला गेला पाहिजे असे आराखड्यात म्हटलेले आहे. प्राथमिक टप्प्यापासूनच काम करायला शिकण्यासाठी काही क्रांतीकारक पावले उचलण्याची गरज आहे, असेही यात सुचवलेले आहे. कारण प्रत्यक्ष काम केल्यामुळे ज्ञानाचे रूपांतर अनुभवामध्ये होते. त्यातूनच स्वावलंबन, कल्पकता आणि सहकार्य यांसारखी महत्त्वाची वैयक्तिक व सामाजिक मूल्ये देखील रुजतात. सर्वच टप्प्यांवर 'कला' हा विषय अंतर्भूत असावा असेही यात म्हटलेले आहे. यामध्ये चारही महत्त्वाची क्षेत्रे म्हणजेच संगीत, नृत्य, दृश्यकला आणि रंगभूमी यांचा समावेश असावा, तसेच ते परस्पर संवादातून साध्य केली जावीत यावर भर देण्यात आलेला आहे.

एनसीएफ 2005 ला प्रतिसाद म्हणून वेगवेगळ्या विषयांकरता विद्यार्थिकेंद्रित अध्यापन शास्त्राच्या दृष्टिकोनानुसार सर्व समावेशक वातावरणासाठी पाठ्यक्रम आणि पाठ्यपुस्तके विकसित केली गेली. प्रत्येक मुलामध्ये शिकण्याची क्षमता असते हे आपण लक्षात घेतले पाहिजे, मात्र आजूबाजूचे वातावरण, परिस्थिती आणि कालसुसंगत सामग्री यांमुळे अध्ययन प्रक्रिया रंजक बनते. त्यामुळे जेव्हा कुठल्याही पाठ्यपुस्तकाचा वापर आपण करतो, तेव्हा त्यामागचा उद्देश आणि ते शारीरिकदृष्ट्या अक्षम आणि दुर्बल कौटुंबिक पार्श्वभूमी असलेल्या मुलांनाही कसे उपयुक्त ठरेल याचा विचार केला गेला पाहिजे.

**चर्चेसाठीचे मुद्दे**

- *विद्यार्थिकेंद्री अध्यापन शास्त्राचा वापर मोठ्या वर्गांमध्ये करता येऊ शकतो का?*
- *विद्यार्थिकेंद्री अध्यापन शास्त्राचा वापर करून सर्व विषयांचे नियोजन करता येऊ शकते का?*

अभ्यासक्रम म्हणजे नियोजित कृतींचा संच, विशिष्ट शैक्षणिक उद्देश/उद्देशांचा संच राबविण्यासाठी याची रचना करण्यात आलेली असते. त्यामध्ये विद्यार्थ्यांना काय शिकविले गेले पाहिजे याचा आशय, त्यांना मिळणारे ज्ञान, कौशल्ये आणि त्यात कोणता दृष्टिकोन विकसित झाला पाहिजे याचे विवरण असते. यामध्ये पाठ्यक्रम, पाठ्यपुस्तके आणि अन्य शैक्षणिक सामग्री, अध्यापनशास्त्र आणि मूल्यांकन या दोन्हींसह आशयाच्या निवडीसाठीचे निकष आणि वेगवेगळ्या पद्धतींची, सामग्रींची आणि मूल्यांकन पद्धतीची निवड यांचा समावेश असतो. अधिक माहितीसाठी एनसीईआरटीने प्रसिद्ध केलेला 'अभ्यासक्रम, पाठ्यक्रम आणि पाठ्यपुस्तके' हा अभ्यास निबंध वाचा.

### अभ्यासक्रम

आपण सारेच जण शालेय शिक्षणाच्या प्रक्रियेतून गेलेलो आहोत. शाळेमध्ये विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठीच्या सर्व कृती पाठ्यक्रमाशी निगडित असतात हे आपल्याला ठाऊक आहे. पाठ्यक्रम समजावून घेणे आणि तो वापरात आणणे यामधील देवाणघेवाणीमध्ये पाठ्यपुस्तकाचा आशय, बोधात्मक आणि मानवी मूल्यांचा विकास आणि लिंगभाव व सर्व विद्यार्थ्यांना सामावून घेणे इत्यादींचा समावेश होतो.

पाठ्यक्रम निर्धारित करण्यासाठी विचारात घेण्याचा प्राथमिक घटक पुढीलप्रमाणे : मान्यताप्राप्त सिद्धांत व सामाजिक प्रभाव यांनुसार अध्ययनाचा प्रकार, मानवी विकासाबाबतचे ज्ञान तसेच, समाजाच्या गरजा व आकांक्षा यानुसारही पाठ्यक्रमाचे स्वरूप ठरविले जात असते. पाठ्यक्रमामध्ये हा परिवर्तनाची भूमिका बजावतो.

शिक्षक आणि शिक्षक प्रशिक्षक म्हणून आपल्याला शिक्षणपद्धतीमध्ये काही गोष्टी अनौपचारिकपणे शिकविल्या जातात हे ठाऊक आहेच. यालाच अलिखित पाठ्यक्रम असे म्हटले जाते.

अशा अलिखित पाठ्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांचे वर्तन, दृष्टिकोन आणि अभिवृत्ती इ. चा शालेय प्रक्रियेत अंतर्भाव केला जातो. असा अलिखित पाठ्यक्रम अभ्यासक्रमाच्या औपचारिक स्वरूपाचा भाग असू शकतो किंवा तो तसा नसू देखील शकतो हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे.

### पाठ्यक्रम

पाठ्यक्रमामध्ये वेगवेगळ्या संकल्पनांची व मुद्द्यांची यादी दिलेली असते. ही यादी इयत्ता व विषय यांनुसार असते. यामध्ये कोणत्या मुद्द्याचे अध्यापन करण्यासाठी किती कालावधी असावा तसेच मूल्यांकनाचे निकष निर्धारित केलेले असतात. पाठ्यक्रमामार्फत पाठ्यक्रमाची माहिती, अपेक्षा व जबाबदाऱ्या याबाबतचे संप्रेषण केले जाते. अध्यापनासाठी हा दस्तऐवज अत्यंत आवश्यक असतो. कारण यामुळे शिक्षणाच्या प्राथमिक घटकांची रूपरेषा तयार होते. कोणते मुद्दे शिकविले जाणार आहेत, साप्ताहिक वेळापत्रक आणि चाचण्यांची यादी, गृहपाठ आणि त्याच्याशी संलग्न असणारे गुणांकन या सर्वांची माहिती त्यात असते. पाठ्यक्रमामध्ये अध्ययन निष्पत्ती, मूल्यांकन, आशय आणि अध्यापनशास्त्राचा प्रत्यक्ष वापर या सर्वांची जोडणी विहीत पद्धतीने केलेली असते. विद्यार्थ्यांना अध्ययनातून मार्गदर्शन कशा प्रकारे मिळेल, हे त्यात अधोरेखित केलेले असते. शैक्षणिक पाठ्यक्रमाचे चार मूलभूत घटक आहेत. ते म्हणजे संकल्पना आणि प्रश्न, उद्देश, सुचविलेल्या कृती, शिक्षकांसाठी संसाधने आणि नोंदी इ.

### पाठ्यपुस्तके

पाठ्यपुस्तके पाठ्यक्रमात समाविष्ट केलेले मुद्दे/संकल्पना यासाठी आशय पुरवितात. पाठ्यपुस्तक हे सर्व विद्यार्थ्यांसाठीचे मुद्रित/डिजिटल स्वरूपातील अध्ययनासाठीचे स्रोत असते. पाठ्यपुस्तके विद्यार्थीस्नेही असणे जरुरीचे असते. त्यामध्ये NCF चा दृष्टिकोनही परावर्तित होणे आवश्यक आहे.

### विद्यार्थिकेंद्री पाठ्यपुस्तकांची वैशिष्ट्ये :

- संवाद साधणे, माहितीपेक्षा कृतींवर अधिक भर.
- विद्यार्थ्यांना स्वत:चे ज्ञान मिळविण्यासाठी व चिंतनासाठी संधी देणे.
- देशातील विविधतेला सामावून घेणारी.
- घटनेतील मूल्यांशी बांधीलकी जपणारी.
- लिंगभाव, सर्वसमावेशकता इत्यादी बाबत सामाजिकदृष्ट्या संवेदनशील इ. साठी संधी देणारी.
- कार्य करण्यासाठी संधी देणारी.
- ICT साठी संधी देणारी.
- मूल्यांकन प्रक्रिया समाविष्ट असलेली.
- आशय सोप्या भाषेत सादर करणारी.
- कला, आरोग्य व शारीरिक शिक्षण यांना समाविष्ट करून घेणारी.



## शाळांमध्ये ग्रंथालयाची भूमिका

एनसीएफ 2005 मध्ये शाळांमध्ये ग्रंथालयांचा पुरस्कार करण्यात आलेला असून, त्यात शाळेतील ग्रंथालय शिक्षक, विद्यार्थी आणि समाज घटकांना आपले ज्ञान व कल्पनाशक्ती अधिक सखोल करण्यासाठीची बौद्धिक संधी म्हणून योजण्यात यावे, असे म्हटलेले आहे. शाळेत सर्व विषयांमध्ये जे अध्ययन केले जाते, त्याचा केंद्रबिंदू शाळेचे ग्रंथालय असावे. शिक्षणतज्ज्ञांना दीर्घकाळ ठाऊक असलेल्या गोष्टीला साक्षरतेबाबतच्या अभ्यासातून पुष्टीच मिळालेली आहे. मुलांचा जेवढा अधिक काळ पुस्तकांसोबत संपर्क येईल, तेवढी ती चांगली वाचक बनतील. शिक्षकांनी दररोज वाचून दाखविले आणि ग्रंथालयाचा मोठ्या प्रमाणावर वापर करून विद्यार्थ्यांचे पुस्तके हाताळणे वाढले, तर त्यांचे वाचन अधिक चांगले होण्यास मदत होते. ग्रंथालयांमुळे मुलांना पाठ्यपुस्तकांच्या पलीकडे जाऊन ज्ञानाचे अधिक स्रोत शोधण्याची शक्यता तयार होते. ग्रंथालये अगदी प्राथमिक इयत्तांमधील मुलांपासून ते किशोरवयीन मुलांपर्यंत सर्वांनाच अध्ययनात मदत करू शकतात. इतकेच नव्हे तर ती शिक्षकांसाठीही मोठाच ज्ञान स्रोत असतात. आज मुलांसाठीच्या ग्रंथालयांमध्ये असणाऱ्या साहित्यात केवळ गोष्टींची पुस्तकेच नव्हेत, तर साहित्य, वास्तववादी लेखन आणि कविता यांसारख्या अनेक प्रकारच्या पुस्तकांचा समावेश आहे. ग्रंथालये वेगळ्या खास कक्षामध्ये किंवा वर्गखोलीत वा ग्रंथालयाच्या रूपात किंवा शाळेला ज्या प्रकारे योग्य वाटेल त्या अन्य प्रकारे अंमलात आणली जाऊ शकतात. येथे महत्त्वाचा मुद्दा असा की मुलांना पुस्तके हाताळता आली पाहिजेत. शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, ग्रंथपाल यांनी ग्रंथालयाची स्थापना करणे व ते चालविणे यांकरिता राज्य सरकार, केंद्रशासित प्रदेश, एससीईआरटी/एसआयईच्या संदर्भानुसार एक ग्रंथालय प्रशिक्षण कार्यक्रम विकसित करण्यात यावा असे सुचविण्यात आले आहे.

**चर्चेसाठीचे मुद्दे**

- *तुमच्या वर्गात पाठ्यपुस्तकांच्या पलीकडे जाण्याबाबतचा एखादा अनुभव सांगा. अशा अनुभवामध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग आणि अध्ययनाबाबत तुमचा दृष्टिकोन काय आहे?*
- *ग्रंथालये हा शिक्षणाचा एक महत्त्वाचा घटक आहे, पण सामान्यत: ती एक पुस्तकांनी भरलेली जागा असेच त्याकडे पाहिले जाते. ग्रंथालयाचा कक्ष अधिक जिवंत व आकर्षून घेणारा कसा होईल याबाबतचे तुमचे विचार मांडा.*

## अध्ययन निष्पत्ती :

एनसीईआरटीने नुकतेच आशयाच्या पाठांतराचे मूल्यांकनाच्या पद्धतीपासून वेगळ्या असणाऱ्या अध्ययन निष्पत्तीचे विकसन केलेले आहे. शिक्षकाला साहाय्य व्हावे याकरिता त्यात क्षमतेवर (अध्ययन निष्पत्तीवर) आधारित असणारे मूल्यांकन करण्यावर भर देण्यात आलेला आहे. विशिष्ट इयत्तेत संपूर्ण वर्षभर मुले ज्ञान, कौशल्ये आणि सामाजिक–वैयक्तिक गुण आणि दृष्टिकोन यांमध्ये होणारा बदल यांबाबत काय काय साध्य करतात याचे शिक्षक आणि संपूर्ण यंत्रणेलाच मूल्यांकन करता यावे, अशी याची योजना आहे. अध्ययन निष्पत्ती म्हणजे एखादा विशिष्ट वर्ग किंवा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर विद्यार्थी जे ज्ञान किंवा कौशल्य मिळवितात यांबाबतची विधाने; त्यासोबतच शिक्षकांनी अध्ययनात अधिक सुधारणा होण्यासाठी विविध अध्यापन पद्धतींचा वापर करणे अपेक्षित आहे; मुलाचा सर्वांगीण विकास कसा झाला आहे हे गुणात्मक किंवा संख्यात्मक पद्धतीने मापन करण्यासाठी असणारी ही विधाने प्रक्रियेवर आधारित असतात. गुणात्मक व संख्यात्मक या दोन्ही पद्धतीने मुलाची एकंदर प्रगती मोजण्यासाठीचे मापनबिंदू त्या पुरवितात. उदा. पर्यावरणाचा अभ्यास करताना पुढील दोन अध्ययन निष्पत्ती असू शकतील.

> *स्पर्धेत संबंधित क्षमता, वचनबद्धता, ज्ञान आणि कौशल्यांचा समूह असतो. ज्यामुळे एखाद्या व्यक्तीला परिस्थितीत प्रभावीपणे कार्य करण्यास सक्षम केले जाते. क्षमता ज्ञानाची आणि कौशल्याची पुरेशी क्षमता दर्शवते जी एखाद्यास विविध परिस्थितीत कार्य करण्यास सक्षम करते.*

- विद्यार्थी वेगवेगळे वयोगट, प्राणी आणि पक्षी यांकरिता असणारी अन्नाची आवश्यकता, अन्न व पाणी यांची उपलब्धता आणि घर व आसपासच्या परिसरात होणारा पाण्याचा वापर यांचे वर्णन करतात.

- विद्यार्थी कुटुंबातील सदस्य, कुटुंबाचा प्रभाव (गुणधर्म/वैशिष्ट्ये/सवयी/पद्धती), एकत्र राहण्याची गरज या संदर्भात मौखिक/लेखी/अन्य पद्धतीने वर्णन करतात.

वरील अध्ययन निष्पत्ती साध्य करण्यासाठी विद्यार्थ्यांना जोडीने, गटांमध्ये आणि एकट्याने काम करण्याच्या संधी दिल्या गेल्या पाहिजेत. आपल्या आजुबाजूचा परिसर कोणता याचे निरीक्षण करण्यासाठी व अनुभव घेण्यासाठी त्यांना प्रोत्साहन दिले गेले पाहिजे. तोंडी/लेखी/चित्रकला/हावभाव यांच्या साहाय्याने त्यांना ते व्यक्त करता आले पाहिजे व त्याची नोंद केली गेली पाहिजे. मुलांना ज्येष्ठांसोबत चर्चा करण्याची परवानगी असली पाहिजे व त्यांना निरनिराळ्या ठिकाणी भेटी देता आल्या पाहिजेत तसेच त्यांना आपल्या आवडीच्या विषयाबद्दल माहिती मिळविता आली पाहिजे व आपल्या निष्कर्षांबाबत गटासोबत चर्चा करता आली पाहिजे.

प्राथमिक पातळीवरील ही अध्ययन निष्पत्ती सर्व मुलांना प्रभावीपणे अध्ययनाच्या संधी देण्यासाठी आहे. या विद्यार्थ्यांमध्ये उपेक्षित व विशेष गरजा असणाऱ्या मुलांचाही समावेश आहे. या निष्पत्ती वेगवेगळ्या अभ्यासक्रमातील क्षेत्रांसाठी विकसित करण्यात आलेल्या आहेत. अध्ययन निष्पत्ती अभ्यासक्रमाबाबत असणाऱ्या अपेक्षांशी आणि अध्यापन शास्त्रातील प्रक्रियांशी निगडित असून त्या सर्व मुलांशी (ज्यामध्ये विशेष गरजा असणाऱ्या मुलांचाही समावेश आहे) निगडित आहेत. उपेक्षित गटातील मुलांसाठी असणाऱ्या तरतुदींमध्ये पुढील गोष्टींचा समावेश आहे.

- अध्ययन प्रक्रियेत ती सहभागी झाल्याची खात्री करून अन्य मुलांसारखीच प्रगती होण्यासाठी त्यांना सहाय्य करणे. मुलांची आपापसात तुलना टाळणे.
- वैयक्तिक गरजांनुसार अभ्यासक्रम आणि अध्ययनाचे वातावरण यामध्ये सुधारणा करणे.
- वेगवेगळ्या आशय क्षेत्रांमध्ये त्या-त्यानुसार कृती करण्याची तरतूद ठेवणे.
- वय आणि अध्ययन पातळी यांनुसार पाठ व अन्य सामग्री उपलब्ध करणे.
- वर्गखोलीचे योग्य नियोजन उदा. गोंगाटाचे नियोजन फलक, चमकणे इ.
- माहिती व संप्रेषण तंत्रज्ञान (ICT), चित्रफिती किंवा डिजिटल स्वरूपातील माध्यमांद्वारे सहाय्य करणे.
- हालचालीसाठी सहाय्यक गोष्टी (व्हील चेअर, कुबड्या, पांढरी काठी), हिअरिंग एड, दिसण्यासाठी किंवा अन्य पद्धतीच्या सहाय्यक गोष्टी, शैक्षणिक साधने (टेलरफ्रेम, अॅबॅकस, इ.)
- शारीरिकदृष्ट्या विकलांग असणाऱ्या मुलांच्या क्षमता व दुर्बलता यांबाबत अन्य मुलांना संवेदनशील बनविणे.
- मूल्यांकन यशस्वीरित्या पुरे करण्यासाठी जास्तीचा वेळ आणि योग्य पद्धती.
- घरी बोलली जाणारी भाषा आणि सामाजिक, सांस्कृतिक वातावरण (परंपरा व अगोदरपासून चालत आलेल्या गोष्टी, इ.)

## सर्व मुलांनी अध्ययन-निष्पत्ती संपादन कराव्यात यासाठी अध्यापनशास्त्र :

> *सर्व भेद मिटवून कसे टाकायचे हा प्रश्न नसून, सर्वांमधले वैविध्य तसेच ठेवून एकत्र कसे आणायचे हा आहे.*
>
> *– रवींद्रनाथ टागोर*

### सर्वसमावेशक वर्गामधील शिक्षकाची भूमिका

अपंगत्व असणाऱ्या व अन्य अल्पसंख्याक मुलांचा शिक्षणामध्ये समावेश करून घेण्याच्या प्रक्रियेचा अभ्यास करीत असतानाच सध्याच्या मुख्य प्रवाहातील यंत्रणेत सर्व वयोगटातील मुलांना चांगल्या दर्जाचे शिक्षण का दिले जात नाही, याची सखोल चिकित्सा होणे आवश्यक आहे. याशिवाय सध्या उपलब्ध असणाऱ्या संसाधनांना ओळखणे व स्थानिक संदर्भात कल्पक गोष्टी करणे, तसेच एखादी गोष्ट प्राप्त करण्यासाठी सहभागी होण्यात व अध्ययनात येणारे अडथळे जाणून घेतले पाहिजेत. त्यासाठी प्रत्येकाला 'प्राण्यांची शाळा' हे हस्तपत्रक वाटा. या कथेनंतर दिलेल्या प्रत्येक प्रश्नाबाबत संपूर्ण वर्गासमोर तुमचे विचार मांडा.

प्रभावी आणि सर्वसमावेशक अध्यापन सर्व मुलांसाठी चांगले असते, हे शिक्षकांनी नेहमी लक्षात ठेवले पाहिजे. त्याचा भर मुलांमधील अनोख्या क्षमता व कमजोरी म्हणजेच त्यांच्या व्यक्तिगत अध्ययनाच्या गरजांवर असतो. अध्ययन निष्पत्ती साध्य करण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रभावी संधी देण्यासाठी केवळ विशिष्ट लोकांनाच ज्ञान न देता ते सर्वसमावेशक करणे, असा मोठा बदल जरूरीचा आहे. आपल्याला केवळ सांस्कृतिक वैविध्यच लक्षात घेऊन चालणार नाही. जर मुलांना शाळेत अध्ययन करायचे असेल व यशस्वी व्हायचे असेल, तर मुलांची सामाजिक आणि आर्थिक पार्श्वभूमी तसेच शारीरिक, मानसिक आणि बौद्धिक गुणवैशिष्ट्यांचाही विचार केला पाहिजे (NCF 2005).

## प्राण्यांची शाळा : चिकित्सेसाठी कथा [२]

कोणी एके काळी प्राण्यांनी नव्या जगातील प्रश्न सोडविण्यासाठी आपण काही तरी मोठी गोष्ट केली पाहिजे असे ठरवले. मग त्यांनी एक शाळा सुरू केली.

- या शाळेतल्या अभ्यासक्रमात धावणे, झाडावर चढणे, पोहणे आणि उडणे या कृती होत्या.
- अभ्यासक्रमाचे प्रशासन सोपे व्हावे म्हणून सर्व प्राण्यांनी सर्व विषय अभ्यासाला घेतले.
- बदक अत्युत्कृष्टपणे पोहत असे. वास्तविक पाहता ते तर त्याच्या प्रशिक्षकापेक्षाही चांगले पोहू शकत असे. मात्र उडण्यामध्ये ते जेमतेम पास झाले आणि धावण्यात तर ते अगदीच वाईट होते. त्याचा धावण्याचा वेग कमी असल्यामुळे, त्याला शाळा सुटल्यानंतर धावण्याचा सराव करण्यासाठी थांबून रहावे लागे आणि तो सराव करण्यासाठी पोहणे देखील रद्द करावे लागे.
- त्याच्या पडदे असलेल्या पायांना इजा होईपर्यंत असेच चालू राहिले. अखेर त्याला पोहणेही जेमतेमच करणे शक्य होऊ लागले. मात्र शाळेत असे सरासरी कामगिरी बजावणे मान्य असल्याने त्याची फारशी चिंता कुणी केली नाही, अर्थातच खुद्द बदक सोडून.
- ससा धावण्यामध्ये वर्गात सर्वप्रथम येत असे, पण पोहण्यामध्ये मात्र तो अगदी मागे पडत असल्याने त्याच्यावर डोके धरून बसायची वेळ आली होती.
- खार झाडावर चढण्यात अगदी हुशार होती, मात्र तिच्या शिक्षकाने झाडावरून खाली उतरण्याऐवजी तिला जमिनीवरून वरच्या दिशेने जायला लावल्याने तिचा रस संपला. तिला अति श्रम करायला लावण्यात आले. त्यामुळे तिला झाडावर चढण्यात 'क' श्रेणी मिळाली तर धावण्यात 'ड' श्रेणी मिळाली.
- गरुड हा एक त्रासदायक विद्यार्थी होता. त्याला शिस्त लावण्यासाठी कठोर प्रयत्न करण्यात आले. झाडावर चढण्याच्या वर्गात तो उंचावर पोचण्यात इतर सर्वांनाच मागे टाकत असे. मात्र आपला स्वत:चाच मार्ग त्यासाठी वापरण्याचा हेका त्याने धरल्यामुळे तो कोणालाच आवडत नसे.
- वर्षाच्या शेवटी एका विचित्र ईलची सरासरी सर्वोत्तम ठरली कारण त्याला उत्तम प्रकारे पोहता येत असे आणि धावता व झाडावर चढता येत असे आणि थोडेसे उडताही येत असे. या सरासरीमुळे तो विजेता ठरला.
- शिकारी कुत्र्यांनी मात्र शाळेत प्रवेश घेतला नाही आणि यामधील बदल समाविष्ट का केले नाहीत यासाठी प्रशासनाशी भांडत राहिले.

### कार्यपत्रिका

**पुढील बाबींवर मुद्दे मांडा :**

- प्राण्यांनी एकसारखेच विषय का घेतले? त्यात त्यांचा फायदा झाला का?

[२] *हे जॉर्ज रियाव्हिस यांच्या ''द ॲनिमल स्कूल'' या कथेचे रूपांतर आहे. सिनसिनाटी पब्लिक स्कूलचे पर्यवेक्षक असताना त्यांनी ही कथा सन 1940 मधे लिहिली होती.*

- सर्व विषयांमध्ये सरासरी गुण मिळविणे शाळेला मान्य होते. हे सर्व प्राण्यांसाठी योग्य होते का?
- खारीला झाडाच्या शेंड्याकडून तळाकडे येण्यास परवानगी का दिली गेली नसावी? तुम्हांला काय वाटते?
- गरुडाकडे त्रासदायक विद्यार्थी म्हणून का पाहिले गेले?
- शिकारी कुत्र्यांना खणणे आणि खड्डा करणे अभ्यासक्रमात समाविष्ट केले पाहिजे असे का वाटत होते?

शाळांमध्ये भेदभाव, शारीरिक शिक्षा, शिवीगाळ, छेडणे/त्रास देणे यांची भीती असता कामा नये. याशिवाय सर्व मुलांना देखील शिक्षणाच्या प्रक्रियेमध्ये समानपणे भाग घेता येईल अशा प्रकारे शिक्षकाने अध्ययनाची कार्ये व अध्यापनशास्त्राशी निगडित कृती योजल्या पाहिजेत. वर्गाचे वातावरण प्रत्येक मुलाला आनंदी व निर्धास्त वाटेल अशा प्रकारचे असावे. कंटाळा, भीती किंवा एकटेपणा वाटेल असे ते असू नये. मुलांना दिला गेलेला शिक्षणासाठीचा मूलभूत हक्क बजावला जाण्यासाठी सर्व मुलांकरिता सुरक्षित व समावेशक वातावरण तयार करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

प्रत्येक मुलाला तो/ती रहात असलेल्या समुदायातील शाळेत जाण्याचा हक्क बजावण्याला पाठिंबा दिला गेला पाहिजे. शिक्षक व वर्ग मित्रमैत्रिणींनी त्याचे/तिचे स्वागत केले पाहिजे व आपल्यात सामावून घेतले पाहिजे. वेगवेगळ्या समाज गटांसाठी वेगवेगळ्या शाळा सुरू करण्यापेक्षा अशा प्रकारे त्यांना सामावून घेणे ही सर्वाधिक फायदेशीर तसेच शैक्षणिकदृष्ट्या व सामाजिकदृष्ट्या अधिक उपयुक्त पद्धत आहे असे अभ्यासातून दिसून आलेले आहे. जेव्हा मुलांची पार्श्वभूमी किंवा अध्ययनाच्या गरजा यांमध्ये भेद न करता त्यांना एकत्र शिक्षण दिले जाते तेव्हा प्रत्येकाचाच फायदा होतो आणि सर्वसमावेशक शिक्षणाचा हाच तर खरा पाया आहे. शाळा आणि शिक्षक यांनी गुणवत्तापूर्ण अध्यापन आणि मुलांना अध्ययनासाठीच्या संधी यांबाबतचे कर्तव्य अधिक जबाबदारीने पार पाडले पाहिजे. एखादा विद्यार्थी यश मिळवू शकत नसेल, तेव्हा शिक्षकाने अशा मुलांमध्ये काही त्रुटी आहेत असा विचार करण्यापेक्षा सध्याच्या अध्यापन–अध्ययन स्थितीमध्ये काही अपुरेपणा आहे का याबाबतचा विचार करणे ध्यानात ठेवणे जरूरीचे आहे. शिक्षणाचा मुख्य उद्देश सर्वांना सामावून घेणाऱ्या शाळा तयार करणे इतकेच मर्यादित नाही, तर सर्वांना सामावून घेणारा समाज तयार करणे हा आहे, हा मुख्य मुद्दा आपण लक्षात घेतला पाहिजे.

**चर्चेसाठीचे मुद्दे**

- *सर्व मुलांनी सर्वसाधारण शाळांमध्येच जावे यासाठी अन्य काही कारणे तुम्हाला दिसतात का?*
- *लहान गट करून त्यात सर्व मुलांना एकत्र शिक्षण दिल्यास सर्वसमावेशक समाजाची जडणघडण होण्यास कशी मदत होईल यावर चर्चा करा.*

शिक्षकांच्या औपचारिक व अनौपचारिक स्वरूपात समाजासोबत होणाऱ्या संवादामुळे नकळत लिंगभेदावर आधारित दृष्टिकोन रुजतात. त्यामुळे शिक्षकाने वर्गात प्रवेश करताना आपले सारे पूर्वग्रह व आग्रही मते बाजूला ठेवूनच आत प्रवेश केला पाहिजे. मुली, खासकरून अनुसूचित जाती व जमातींसारख्या उपेक्षित गटांमधील मुलींना अनेकदा त्यांच्या अध्ययनाच्या ठिकाणी एकटे पडल्यासारखे वाटते. पाठ्यपुस्तकातील आशयासोबत स्वत:च्या संस्कृतीला न जोडता येणे, पाठात ठरावीक बाजूला झुकलेले विशिष्ट साचे, स्त्रियांची दुय्यम भूमिका व पुरुष प्रगतिशील भूमिकेत असल्याचे दर्शवणारी चित्रे; वेगवेगळ्या कृतींमध्ये भूमिका आणि जबाबदाऱ्यांचे

**शाळेतील वातावरण**

**समावेशित शिक्षण**




- *मुलाला सामावून घेण्यासाठी व्यवस्था बदला. मुले वेगवेगळी असतात.*
- *सर्व मुले शिकू शकतात.*
- *वेगवेगळ्या क्षमता, वांशिक गट, आकार, वय, पार्श्वभूमी, लिंग*

वाटप करताना शिक्षक करत असलेला भेद्भाव, अपमानजनक शब्दांचा वापर, इ. मुळे असे घडू शकते. अशा प्रकारचा दृष्टिकोन त्यांच्याबद्दल बाळगल्यामुळे त्यांच्यात न्यूनगंड तयार होतो आणि एकटे पडल्याची भावना तयार होते. यांमुळे त्यांच्या वर्गातील कृतींमधील सहभागावरही विपरित परिणाम होतो. अशा वेळी शिक्षक महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकतो. शिक्षकाने अध्यापन-अध्ययनासाठीचे वातावरण सहयोगयुक्त ठेवले पाहिजे आणि मुलींना देखील अध्ययनाच्या प्रक्रियेत कृतिशीलपणे सहभागी होता येईल याची खात्री करून घेतली पाहिजे. शिक्षकाने सर्वप्रथम सगळ्या शाळेतल्या कृतींमध्ये असणारे लिंगभेदाचे मुद्दे ओळखले पाहिजेत आणि त्यानंतर वर्गात व वर्गाबाहेरही या संबंधीच्या कोणत्या कृती कराव्यात, याची योजना करून त्या सुधारणा राबविल्या पाहिजेत. अशा प्रयत्नांमुळे वर्गामध्ये मुलींसह सर्व विद्यार्थ्यांना आपले अनुभव इतरांसमोर व्यक्त करता येतील. सध्याच्या पूर्वग्रहांबाबत आणि साचेबद्ध भूमिकांबद्दल प्रश्न विचारता येतील असे वातावरण निर्माण होईल. यातून निर्माण होणाऱ्या चर्चा व वादविवाद यांमुळे योग्य उपाययोजना करता येतील.

**चर्चेसाठीचे मुद्दे**

- *गट करून त्यांमध्ये शिक्षक कशा प्रकारे मुलांमध्ये लिंगभेद विरहित वर्तन विकसित करू शकतात याबद्दल चर्चा करा.*

## शिक्षकाकडे असणारी कौशल्ये :

**विविधतेचा स्वीकार करा व तिचा उपयोग करा.**

- **विद्यार्थ्यांमध्ये असणारे वैविध्य ओळखण्यासाठीची संवेदनशीलता :** मुलांमध्ये (शारीरिकदृष्ट्या अक्षम असलेल्या विद्यार्थ्यांसहित असणारी शक्ती स्थळे व दोष, त्यांच्या बुद्धीचा कल व रस यांबाबत जागरूक असणे.
- **विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक-सांस्कृतिक, सामाजिक-आर्थिक आणि शारीरिक विविधतेचा स्वीकार करणे :** समाजातील सांस्कृतिक वातावरण, परंपरा आणि सांस्कृतिक आचरणाच्या पद्धती, निसर्गत: राहण्याचे ठिकाण, घरी असणारे वातावरण आणि आजूबाजूचा परिसर यांना जाणून घेणे.
- **विविधतेचे कौतुक करणे आणि तिचा संसाधन म्हणून विचार करणे :** मुलांकडे असणारे वेगवेगळे संदर्भ आणि ज्ञान यांचा अध्ययनाच्या प्रक्रियेमध्ये वापर करून घेणे.
- **विशेष शैक्षणिक गरजा :** गरजा जाणून घेण्यासाठी व त्यावर कृती करण्यासाठी तद्नुभूती (empathy) चा वापर करणे.

***सर्वसमावेशक शिक्षण आणि दिव्यांग जन कायदा 2016 :***

*नुकताच अस्तित्वात आलेला RPWD कायदा 2016 म्हणजेच दिव्यांगजन अधिकार कायद्यामध्ये (मराठी नाव) सर्वसमावेशक शिक्षण पुरस्कृत करतो. त्याची व्याख्या कायद्यात अशा प्रकारे केलेली आहे - सर्वसमावेशक म्हणजे अशा प्रकारचे शिक्षण, जेथे अपंगत्व असणाऱ्या वा नसणाऱ्या विद्यार्थ्यांना एकत्र शिकता येईल आणि अध्यापनाची व अध्ययनाची यंत्रणा योग्य पद्धतीने अपंगत्व असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या वेगवेगळ्या गरजा ओळखून त्यानुसार adapt केली जाईल. (कलम 1m, दिव्यांगजन अधिकार कायदा, 2016)*

- **विद्यार्थ्याला वेगवेगळे पर्याय देण्यासाठी संसाधने गोळा करण्याची क्षमता असणे :** मुद्रित व डिजिटल माध्यमांतून वेगवेगळी संसाधने ओळखणे व ती मिळण्याची व्यवस्था करणे, आजूबाजूच्या परिसरातील अल्प खर्चातील सामग्री मिळविणे, वेगवेगळ्या वस्तू, जवळच्याच भागातील ज्ञानार्जनासाठीच्या जागा आणि साहाय्य करणाऱ्या संसाधन व्यक्ती.
- **अध्ययनासाठी तंत्रज्ञानाचे साहाय्य :** वेगवेगळ्या ॲप्सचा वापर. उदा. गूगल आर्ट ॲन्ड कल्चर, गूगल स्काय, गूगल अर्थ, विषयानुरूप विशिष्ट ॲप्स : जिओजेब्रा, टक्स ऑफ मॅप, आणि गूगल स्पीक.
- **व्यक्ती-व्यक्तींमधील नातेसंबंध हाताळताना/कौशल्ये :** श्रवण, प्रतिसाद देणे, संभाषणाला सुरुवात करणे व ते सुरू ठेवणे, सकारात्मक वृत्ती, शरीर व हातवारे यांचा सकारात्मक वापर यांबाबतची कौशल्ये.

**चर्चेसाठीचे मुद्दे**

- *आपल्या अध्यापनात वैविध्य आणताना तुम्ही पुढीलपैकी कोणत्या कौशल्यांचा वापर केला आहे का?*
- *तुमच्या वर्गामधील सर्व विद्यार्थ्यांनी समप्रमाणात सहभागी व्हावे यासाठी कोणत्या प्रकारची अध्यापन कौशल्ये तुम्ही वापराल?*

## लिंगभावाबाबत संवेदनशील असणारे शिक्षण :

लिंगभाव आता सर्व ज्ञान शाखांमध्ये व्यापलेला आहे हे आपल्या सर्वांना ठाऊकच आहे. ज्ञानाच्या बांधणीसाठीचा तो पायाच आहे. अध्यापनशास्त्रामध्ये लिंगभावाबद्दलची संवेदनशीलता हा एक महत्त्वाचा विषय आहे. शिक्षकांनी तो अध्यापन–अध्ययन प्रक्रियेमध्ये समाविष्ट केला पाहिजे. आपला सकारात्मक दृष्टिकोन आणि अध्यापनशास्त्रावर आधारित कृती यांद्वारे शिक्षक समाजात चालणाऱ्या विविध प्रक्रियांमुळे विद्यार्थ्यांच्या मनात ठसलेल्या लिंगभावावर आधारित साचेबद्ध कल्पना काढून टाकू शकतो. शिक्षकाने याखेरीज पाठ्यक्रमातील आशयात व अभ्यासक्रमातील विविध देवाणघेवाणींमध्ये असणारा लिंगभेद ओळखला पाहिजे; दिलेल्या आशयामध्ये असणारे पूर्वग्रह किंवा स्त्री व पुरुष पात्रांना दिल्या गेलेल्या भूमिका त्याने जाणून घेतल्या पाहिजेत; तसेच भाषेमधील पूर्वग्रह ओळखून राजकीय, सामाजिक व आर्थिक प्रक्रियांमध्ये स्त्रियांचा असणारा सहभाग त्याने अधोरेखित केला पाहिजे.

## ज्ञानशाखांमधील देवाणघेवाणीमध्ये सर्वसमावेशकतेचा पुरस्कार करणे.

'मी विद्यार्थ्याच्या भूमिकेत असताना' याबद्दलची सहा विधाने वाचा व स्वत:ची स्वत: ही विधाने पूर्ण करा.

**मी विद्यार्थी असताना** [३]

**स्वतंत्रपणे वाक्य पूर्ण करा :**

**माझे अध्ययन कमी वेगाने होते, जेव्हा** ..............................

..............................

..............................

**मी ताबडतोब शिकतो, जेव्हा** ..............................

..............................

..............................

**पाठ्यपुस्तकातून शिकणे मला** ..............................

..............................

..............................

**गटांमध्ये शिकणे मला** ..............................

..............................

..............................

**मला अशा व्यक्तीकडून शिकता येते, जी** ..............................

..............................

..............................

[3] *UNESCO च्या Teachers Education Resource Pack : Special Needs in the Classroom यावर आधारित.*

**मला शिकायला अशा वेळी आवडते, जेव्हा** ..........................................................................................

.............................................................................................................................

.............................................................................................................................

या प्रत्येक विधानाखालील तुमचा प्रतिसाद मोठ्या गटासोबत एकत्र करा. यशस्वीरित्या अध्ययन करण्यासाठी आपणा सर्वांनाच निरनिराळे प्राधान्यक्रम असतात हे अगदी स्पष्ट आहे. वरील कृती तुमच्या वर्गातील मुलांसोबत देखील करता येतील. त्यामुळे तुम्हाला ते विद्यार्थी म्हणून कसे आहेत त्याबाबत अधिक जाणून घेता येईल व आपल्या अध्यापनाचे नियोजन त्यानुसार करता येईल. तुम्ही मुलांनाही वाक्ये लेखी किंवा तोंडी स्वरूपात पूर्ण करायला सांगू शकता.

## भाषा शिकवित असतानाची सर्वसमावेशकता

काही मुलांना भाषा शिकताना विशेष अडचणी येतात. अशा अडचणी दूर करण्यासाठी शिक्षकाने योग्य त्या कल्पक कृती केल्या पाहिजेत. त्यात पुढील बाबींचा समावेश असू शकेल.

- आशयाची प्रत्यक्ष आयुष्यातील घटनांशी जोडणी करून दाखविणे, ज्यायोगे सर्वच मुलांना त्याचा लाभ होईल,
- जेव्हा एखाद्या भागात एकाहून अधिक भाषा वापरल्या जात असतील, तेव्हा त्यातील प्रामुख्याने बोलली जाणारी भाषा निवडणे,
- सर्व मुलांमध्ये चिन्हांची भाषा (sign language) आणि ब्रेल लिपीबाबत जागरूकता व संवेदनशीलता निर्माण करणे,
- भाषेचा मौखिक रूपात वापर करत असताना येणाऱ्या अडचणींवर मात करण्यासाठी पर्यायी संवाद व्यवस्था तयार करणे,
- ज्या मुलांना लिहिण्यात अडचण येत आहे त्यांच्याकरिता ICT चा वापर करणे,
- काही मुलांना लिखित मजकुराचा अर्थ लावण्यासाठी साहाय्य लागू शकते,
- दीर्घ परिच्छेद वाचण्यासाठी अधिक वेळ पुरविणे व वैयक्तिक लक्ष देणे तसेच दृश्य माहितीवरून शिकणे. ब्रेललिपी वाचत असताना वाक्यप्रयोग, वाक्ये, इ. पूर्ण स्वरूपात लक्षात ठेवणे आणि त्याचा पुनर्वापर करणे शक्य होत नाही. त्यामुळे ज्या विद्यार्थ्यांना दृष्टिदोष असेल त्यांना ब्रेल लिपीतील मजकूर वाचताना अधिक वेळ लागू शकतो.
- श्रवणदोष असणाऱ्या मुलांसोबत काम करत असताना शिक्षकांनी व अन्य व्यक्तींनी त्यांना पुढील गोष्टींसाठी साहाय्य करावे : नवीन शब्दांचा अर्थ लावणे, शब्दांमधील फरक ओळखणे आणि एकाहून अधिक अर्थ असणारे शब्द समजावून घेणे.
- व्याकरणाच्या व रचनेच्या दृष्टीने योग्य प्रकारे वाक्ये तयार करणे काही मुलांना कठीण जाऊ शकते. व्याकरणाचा वापर (भूतकाळ, उपसर्ग, कर्तरी व कर्मणी प्रयोग) यांसारख्या गोष्टी आव्हानात्मक वाटू शकतात. शिक्षकांनी वाक्यरचना, कल्पना व संकल्पना यांची जोडणी, विचारांची मांडणी आणि आकलन तसेच वाक्प्रचार वापरणे यांसारख्या गोष्टींकडे विशेष लक्ष दिले पाहिजे.
- ज्या मुलांना बोधात्मक गोष्टींमध्ये अडचण येत असेल त्यांसोबत काम करताना शिक्षक व अन्य व्यक्तींनी पुढील बाबतीत साहाय्य करावे : मौखिक भाषा (ऐकणे, कल्पना व्यक्त करणे आणि/किंवा बोलणे), शब्दांची जुळणी करणे (अस्खलितपणे व सुसंगतपणे बोलण्याची क्षमता), वाचन (यामध्ये अर्थ लावणे, उच्चारांचे ज्ञान व शब्द ओळखणे), विद्यार्थी शब्द गाळू शकतात, चुकीच्या ठिकाणी वाचू शकतात, एका शब्दाची दुसऱ्या शब्दासोबत गल्लत करू शकतात आणि भाषेतील वाक्यप्रयोगांना समजावून घेण्यात त्यांना कठीणता वाटू शकते. उदा. म्हणी, रूपके, उपमा, इ.
- भाषेचा अर्थ लावणे (नवा शब्दसंग्रह, वाक्यरचना, वेगवेगळे अर्थ असणारे शब्द व संकल्पना), खास करून या गोष्टी जेव्हा वेगाने सादर होतात, तेव्हा त्यांना वर्गात टिपणे लिहिण्यास अडचण येऊ शकतात. विद्यार्थ्यांना आपले विचार नीटपणे मांडायला, उजळणी करायला, शब्दांचे उच्चार करायला आणि/किंवा एखाद्या कथेचा नीट क्रम लावायला अडचणी येऊ शकतात हे लक्षात घेतले पाहिजे. या खेरीज डोळे व हात यांच्या परस्पर संलग्न कृती व लेखन (वाचता न येणारे हस्ताक्षर, नेहमी होणाऱ्या लेखनातील चुका) यांसारख्या अडचणींवरही लक्ष ठेवले पाहिजे.

## गणित अध्यापनातील सर्वसमावेशकता :

विषय समजावून घेताना अडचणींवर मात करण्यासाठी काही विद्यार्थ्यांना सोप्या भाषेत ते सांगणे, हाताळता येईल अशी सामग्री वापरणे जरुरीचे असते. भूमिती शिकविण्याकरिता शैक्षणिक साधने वापरणे, बेरीज–वजाबाकी सोडविताना आकडेमोडीस साहाय्य करणे यांसारख्या वेगवेगळ्या प्रकारची मदत लागते. मुलांना आलेख, तक्ते किंवा स्तंभालेखांचा अर्थ लावण्यासही मदत लागू शकते. काही विद्यार्थ्यांना तोंडी सूचनांचा अर्थ लावण्यास मदत लागू शकते किंवा मनातल्या मनात गणिते करण्यासही त्यांना साहाय्य लागू शकते. माहिती व संप्रेषण तंत्रज्ञानाचा वापर करून संख्यात्मक व अमूर्त संकल्पना समजावून घेण्यात येणाऱ्या अडचणी दूर करता येतील.

- ज्या मुलांना दृष्टिदोष आहे त्यांना अवकाशविषयक संकल्पना समजावून सांगताना तसेच त्रिमितीय वस्तूंचे द्विमितीय आकारांमध्ये रूपांतर व गणितात वापरली जाणारी विशिष्ट चिन्हे समजावून घेताना शिक्षक किंवा अन्य व्यक्तीचे साहाय्य लागू शकते. अशा मुलांना गणित विषयातील मजकुराच्या ध्वनीमुद्रणाचा अर्थ लावण्यास अडचण येऊ शकते. (उदा. समीकरणे) ती लिहिण्यामध्ये आणि ब्रेललिपीतील अवकाश दर्शवण्याच्या योजनेमुळे गणिता संदर्भातील मजकूर वाचण्यामध्ये, रंगांनी केलेले संकेत (code) आणि नेमेथ ब्रेलकोड शिकताना किंवा गणिताशी संबंधित अन्य ब्रेल मजकूर वाचताना अडचण येऊ शकते.
- ज्या विद्यार्थ्यांना श्रवणदोष आहे अशा विद्यार्थ्यांसोबत काम करताना शिक्षक किंवा अन्य व्यक्तींना पुढील बाबतीत साहाय्य पुरवावे लागेल : भाषिक वाढ होण्यास उशीर, ज्यामुळे एकूणच कमी शब्दसंपत्ती, तसेच गणिताबाबत लागणारी तांत्रिक शब्दसंपत्ती (व्यस्त प्रमाण, एकरेषीय, इ.), शब्दप्रधान गोष्टी समजावून घेण्यातल्या अडचणी, (गणितातील प्रश्नाचा अर्थ समजावून सांगण्याकरिता वापरलेले अनेक शब्द, आणि एकाहून अधिक अर्थ असणाऱ्या शब्दांची उकल करणे, उदा. व्याज, टेबल, पत, कोन, दर, आकारमान, बल, बिंदू इ.) विद्यार्थी जेव्हा समोरच्याच्या ओठांचे/बोलण्याचे निरीक्षण करून अर्थ लावत असतो तेव्हा त्याला गणितातील शब्दांमधील फरक ओळखण्यास अडचणी येऊ शकतात. (सहा आणि दहा, सात आणि साठ, इ.) बोधात्मक ज्ञानालाही मर्यादा येत असल्यामुळे योग्य माहिती निवडणे व गणिते सोडविण्यासाठी आवश्यक ते नियम वापरणे यातही अडचणी येऊ शकतात.
- ज्या मुलांना बोधात्मक अडचणी असतात त्यांच्या समोर क्रम लावणे, टप्प्याटप्प्याने गणित सोडवणे आणि विशिष्ट ठिकाणी संख्या लिहिणे यांसारखे प्रश्न येतात. गणिती आकडेमोड (बेरीज–वजाबाकी), अंक उलट फिरवणे, गणिते उतरवून घेणे आणि गणिती चिन्हांमध्ये गोंधळ उडणे. उदा. + ऐवजी ×, तसेच कोणत्या क्रमाने गणितीकृती करायच्या ते न आठवणे यांसारख्या गोष्टी दिसून येतात. बीजगणित आणि पूर्णांक यांसारख्या अमूर्त संकल्पनांचा अर्थ लावण्यातही अनेक मुलांना अडचणी येतात. तसेच भूमितीतील वेगवेगळे आकार किंवा शब्दांत सांगितलेली गणिताची दिशात्मकता आणि अर्थ लावणेही कठीण जाते.

## पर्यावरणशास्त्र व विज्ञान अध्यापनातील सर्वसमावेशकता :

काही विद्यार्थ्यांना प्रयोग वा हातांनी करण्याच्या कृतींमध्ये हालचाल करणे किंवा गोष्टी हाताळणे यांकरिता साहाय्य लागू शकते. अशा कृती वर्गखोलीत किंवा वर्गाबाहेरही असू शकतात. विद्यार्थ्यांना त्यांच्याशी जुळवून घेतलेल्या किंवा पर्यायी कृती, सुधारित उपकरणे, माहिती व संप्रेषण तंत्रज्ञानाचा वापर, प्रौढ व्यक्तीचे किंवा वर्ग मित्र–मैत्रिणींचे साहाय्य, अधिक वेळ आणि मदत या गोष्टी त्यांना सहजासहजी मिळू शकत नाहीत.

- शिक्षकांनी आणि दृष्टिदोष असणाऱ्या मुलांसोबत काम करणाऱ्या व्यक्तींनी त्यांना फळ्यावर लिहिलेला मजकूर समजावून देणे, प्रात्यक्षिके, सादरीकरणे, चित्रे व आकृत्या, प्रयोग यांबद्दल माहिती द्यावी. शिवाय स्वत:ची सुरक्षितता कशी बाळगावी हे शिकवावे. तसेच अमूर्त व कठीण संकल्पनाही त्यांना समजावून सांगाव्यात. त्यांना हे समजावून घेण्यासाठी अधिक काळ लागू शकतो.
- श्रवणदोष असलेल्या मुलांना अमूर्त शब्द समजावून घेण्यासाठी व अमूर्त संकल्पनांमधील संबंध समजावून घेण्यासाठी साहाय्य लागते. प्रकाशसंश्लेषण, अधिवास (habitat), सूक्ष्मजीव यांसारख्या वैज्ञानिक संकल्पना दृश्य स्वरूपात दर्शविल्याशिवाय समजावून घेणे कठीण जाते. एकापेक्षा अधिक मिती असणारे प्रश्न सोडविताना उदा. संख्या, आकारमान, आकार आणि रंग या सर्वांचा विचार करून वेगवेगळ्या वस्तूंची तुलना करणे हे केवळ आकारमान या एकाच मितीशी तुलना करण्यापेक्षा कठीण जाते.

- विज्ञानामधील तांत्रिक संज्ञा समजावून घेत असताना आणि वेगवेगळ्या संकल्पनांमधील अर्थपूर्ण जोडणी/नातेसंबंध समजावून घेत असताना (उदा. दाब आणि बल) ज्या मुलांना बोधात्मक गोष्टी समजावून घेण्यात अडचण आहे त्यांना या संकल्पना व्यवस्थित समजण्यासाठी अगोदरच तयारी करावी लागते. अमूर्त संकल्पना समजावून घेणे, नियोजन, आयोजन, क्रम लावणे आणि सर्वसामान्यीकरण करणे यांकरिता या सर्व गोष्टींची गरज असते. विज्ञानातील प्रयोग करत असताना वर्गातील मित्रमैत्रिणींची मदत घेण्याने त्यांचे काम सोपे होते.

## सामाजिक शास्त्र अध्यापनातील सर्वसमावेशकता

पर्यावरण, विज्ञान आणि सामाजिक शास्त्र शिकवताना या विषयांमधील अध्ययन निष्पत्ती साध्य करण्याकरिता काही विद्यार्थ्यांना मजकुराचे आकलन करून घेण्यासाठी तयार ध्वनिफिती, ऑडिओबुक/डेझीबुक, आपल्या कल्पना पर्यायी संपर्क माध्यमातून व्यक्त करण्यासाठी लेखनात मदत, उदा. ICT किंवा बोलणे; आशय आणि कृती यांचे रूपांतर, दृश्य माहितीचे व्यवस्थापन करण्यासाठी शैक्षणिक साधने, वेगवेगळ्या भौगोलिक संकल्पना, वैशिष्ट्ये आणि पर्यावरण यांना समजावून घेण्यासाठी साहाय्य लागू शकते. प्रकल्प आणि गृहपाठ यांसारख्या गटांच्या कृती परस्पर सहकार्यातून होणाऱ्या अध्ययनाद्वारे केल्या गेल्या तर सर्वच विद्यार्थ्यांना वर्गातील उपक्रमांमध्ये कृतीशीलपणे सहभागी होणे शक्य होईल. याकरिता स्पर्शाद्वारे वाचता येणाऱ्या (tactile) आकृत्या/नकाशे, ऑडिओबुक्स, चित्रफिती-ध्वनिफिती आणि ब्रेल सामग्री इत्यादींचा वापर करता येईल.

- भौगोलिक संज्ञा आणि संकल्पना समजावून सांगताना दृष्टिदोष असणाऱ्या मुलांकरिता शिक्षकांनी अगोदर योजना करणे जरूरीचे आहे. उदा. अक्षांश, रेखांश, रेषा तसेच चित्रात्मक व दृश्य वर्णने उदा. ऐतिहासिक स्मारकांच्या वास्तूकलेचा अभ्यास करीत असताना नकाशे, आलेख, आकृत्या, चित्रे, शिलालेख आणि चिन्हे यांचे वाचन करणे.
- या मुलांना पर्यावरण आणि अवकाश यांचे निरीक्षण करण्यासही साहाय्य लागते. जमीन, वातावरण, वनस्पती आणि वन्यजीव, संसाधनांचे वितरण व सेवा यांकरिता शब्दांची यादी, अभ्यासाकरिताचे प्रश्न, यांसारखी संदर्भ सामग्री दिली जावी. विद्यार्थ्यांना अन्य माहितीही मोठ्या अक्षरात, हाताळता येईल अशा किंवा ठसा उमटवलेल्या प्रकारात किंवा ठळक रंगात दिसेल अशा प्रकारे पुन्हा चित्रांकन करून द्यावी.
- श्रवणदोष असलेल्या मुलांना संज्ञा, तांत्रिक शब्द अमूर्त संकल्पना, घटना, तुलना, कारण-परिणाम यांतील नातेसंबंध व घटनाक्रम, इ. समजावून घ्यायला साहाय्य लागू शकते. माहिती असणारा मजकूर (पाठ्यपुस्तके, संदर्भ सामग्री) वाचूनही मुले व्यवस्थित शिकू शकतात व आपले निष्कर्ष काढू शकतात.
- रेखाटने, भित्तीचित्रे, आलेख, आणि नकाशे यांचे वाचन काही विद्यार्थ्यांना खासकरून बोधात्मक प्रक्रिया करण्यात अडचण भासणाऱ्या विद्यार्थ्यांना कठीण जाऊ शकते. ज्या विद्यार्थ्यांना वाचनात अडचण आहे, अशांना दीर्घ मजकुरातून महत्त्वाचा सारांश काढणे कठीण जाते. याखेरीज अशा मुलांना घटनांचा क्रम आणि त्यांचे परस्परांशी असणारे नाते, लक्षात ठेवण्यास अडचण येऊ शकते हे शिक्षकांनी नेहमी लक्षात घेतले पाहिजे. गोष्टींचे सर्वसामान्यीकरण करणे आणि पाठ्यपुस्तकातील माहितीचे आजूबाजूच्या वातावरणाशी संबंध जोडणे यांमुळे काही प्रश्न उभे राहू शकतात. काही विद्यार्थ्यांची आकलन क्षमता मर्यादित असते व त्यांना अमूर्त संकल्पना समजत नाहीत.

## सर्वसमावेशक वातावरणाचे मूल्यांकन

या अगोदरच्या विभागात आपण वेगवेगळ्या अध्ययनाच्या गरजा असणाऱ्या मुलांकरिता सर्वसमावेशक वर्ग कशा प्रकारे निर्माण करता येईल यासाठीच्या काही कल्पना व उदाहरणे पाहिली. या विभागामध्ये अशा सर्वसमावेशक वातावरणाचे मूल्यांकन करण्यासाठीच्या काही सूचना दिलेल्या आहेत. तुम्ही देखील अशा सर्वसमावेशकतेचे मूल्यांकन करण्यासाठी नवनवे मार्ग शोधून काढावेत असे आम्हांला वाटते. आपल्या अध्यापनाचे नियोजन करत असताना एक गोष्ट लक्षात ठेवणे जरूरीचे आहे. ती म्हणजे पाठ शिकवित असताना संपूर्ण वेळ असे मूल्यांकन सुरूच असते. यामुळे तुम्हाला विषय शिकवित असताना पुढे कशा प्रकारे पावले उचलायची हे जाणून घेता येईल


व त्यानुसार नियोजन करता येईल. पाठ शिकून झाल्यानंतर त्याचे मूल्यांकन केल्याने तुमच्या अध्यापनाचा उद्देश किती प्रमाणात साध्य झाला हे तुम्हाला जाणून घेता येईल.

*NCF 2005 च्या अनुसार मूल्यांकनामध्ये पुढील गोष्टी टाळाव्यात :*

- *मुलांना धमकावून अभ्यास करायला लावणे.*
- *मुलांचे 'हळू शिकणारा', किंवा 'हुशार विद्यार्थी', किंवा 'त्रासदायक विद्यार्थी', अशा प्रकारचे वर्गीकरण किंवा नामकरण करू नये अशा श्रेणी पाडल्यामुळे मुलांना इतरांपासून वेगळे केले जाते व अध्ययनाची जबाबदारी संपूर्णत: त्यांच्यावरच टाकली जाते आणि अध्यापनशास्त्राची भूमिका व उद्देश साध्य होत नाहीत.*



बरखा – वाचन मालिका




- मिश्र गटांमध्ये एखाद्या प्रश्नाची वेगवेगळी उत्तरे मिळावीत याकरिता प्रोत्साहन द्या आणि त्यांना स्पष्टपणे संदेश द्या. प्रश्न विचारल्यावर मुलांना उत्तर देण्याकरिता पुरेसा वेळ द्या. आशय समजावून सांगण्यासाठी केलेल्या कृतींचा वापर पुन्हा मूल्यांकनासाठीही करता येऊ शकतो हे लक्षात घेणेही जरूरीचे आहे.
- उत्तरे निवडताना लवचीकता दाखवा, उदा. एखादी गोष्ट आठवण्यापेक्षा ती जाणणे किंवा ओळखणे अधिक चांगले, योग्य उत्तराला रंगवणे, कापणे व चिकटविणे, जोड्या लावणे, विसंगत गोष्ट दर्शविणे. उदा.
  - ज्या गोष्टी ऐकून प्रतिसाद द्यायचा आहे, तेव्हा एक अक्षरी प्रतिसाद मान्य करावा.
  - पुस्तकातील अक्षरे गिरवण्याच्या कृतींऐवजी कापलेली अक्षरे वापरावीत. यामुळे विद्यार्थ्यांना प्रत्येक अक्षराचा आकार व वळण यांचे बारकाईने निरीक्षण करता येईल.
  - ज्या विद्यार्थ्यांना बोलण्यामध्ये अडचण येते, त्यांना चित्रे किंवा ठसे वापरून ते दर्शविण्यास सांगावे. मुलांना आकलन झाले आहे हे सांगण्यासाठी त्यांना चित्राकडे (चित्रांकडे) बोट दर्शविण्यास सांगावे.
- केवळ तोंडी किंवा लेखी प्रतिसाद मिळविण्यापेक्षा फ्लॅश कार्ड, शब्द दर्शविणारी कार्ड, (शब्दांचा परिचय किंवा व्याकरणाच्या दृष्टीने अचूक वाक्य तयार करणे यांकरिता) आणि चित्रे या खरोखरच्या वस्तू हे दाखवून प्रतिसाद मिळवावा. उदा. तुम्ही जेव्हा एखाद्या प्राण्याचे नाव घ्याल, तेव्हा मुलाला त्याचे चित्र असलेले कार्ड उचलण्यास सांगावे. जोड्या लावणे किंवा उत्तरे तपासणे यांसारख्या कृती खरोखरच्या वस्तू वापरून करता येतील.

**चर्चेसाठीचे मुद्दे**

*आपल्या जोडीदारासोबत चर्चा करा.*

- *तुमची शाळा अधिक सर्वसमावेशक कशी कराल?*
- *सर्वसमावेशक शिक्षणामुळे मुलांना आपले कुटुंब व समाजात राहण्यास कशा प्रकारे मदत होते?*
- *सर्वसमावेशक धोरणामुळे शिक्षण पद्धती किती प्रमाणात दृढ होते व सर्वांसाठी शिक्षणाची गुणवत्ता किती प्रमाणात वाढते?*

## निष्कर्ष :

या विभागामुळे विद्यार्थ्यांना व अन्य भागधारकांना (Stakeholders) शाळा सर्वसमावेशक बनविण्यास मदत होईल. वेगवेगळ्या गटातील विद्यार्थ्यांसोबत प्रभावीपणे काम करण्यासाठी व त्यांना ज्ञान, दृष्टिकोन आणि विद्यार्थ्यांना अध्यापन करण्यासाठी कौशल्ये प्राप्त होतील. अभ्यासक्रमाचे संरचना आराखडे, खासकरून NCF 2005, अध्ययन निष्पत्ती आणि हे साध्य करण्यासाठीच्या योग्य अध्यापन पद्धती हा आशय वाचकांना राष्ट्रीय धोरणाचे बारकाईने अवलोकन करण्यास साहाय्य करेल. यामुळे शिक्षकांना पुढील गोष्टी करता येतील : सर्वसमावेशक धोरणे राबविणे व प्रत्येक मुलाचा गटाचा सदस्य म्हणून स्वीकार करणे, वर्गखोलीची भौतिक व मानसिक पातळीवर पुनर्रचना करून सर्व मुलांच्या गरजा पूर्ण होतील हे पाहणे, वर्गातील सर्व विद्यार्थ्यांना सहभाग घेता येईल अशा प्रकारे कृतींचे नियोजन करणे आणि विद्यार्थ्यांमधील विविधतेला सामावून घेईल अशा प्रकारे शाळेची कार्यपद्धती ठेवणे.


### स्व-मूल्यांकन :


- पाठ शिकवित असताना विविध विद्यार्थ्यांना तुमचा विषय समजावा यासाठी कोणते बदल कराल, ते थोडक्यात लिहा.
- तुम्हाला याकरिता जो मुद्दा महत्त्वाचा वाटतो त्याच्या प्राधान्य क्रमानुसार हे बदल लिहा.


  1.


  2.

  3.
- एक शिक्षक म्हणून हे बदल घडवून आणण्यासाठी तुम्हाला कोणाचे साहाय्य व मार्गदर्शन लागेल त्याबद्दल लिहा.
- हे सर्व बदल सर्व मुलांना लाभदायक कसे ठरतील? तुमच्या शाळेतील अन्य सहकाऱ्यांसोबत आपली उत्तरे पडताळून पहा व तुमच्या यादीत नव्या कल्पना जोडा.
- मी मूल्यांकन अर्थपूर्ण आणि सर्व मुलांना सामावून घेणारे कशा प्रकारे करू शकेल? तुमची यादी आपल्या जोडीदारासोबत पडताळून पहा.




❑❑❑